# : प्रकरण दुसरे :

## शेतकरी - वृध्दाची व्याख्या

वृध्द शेतकऱ्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास करीत असतांना किंवा शेतकरी वृध्दांच्या समाजशास्त्रीय अभ्यासाला सुरवात करीत असतांना शेतकरी व वृध्द शेतकरी यांची सुस्पष्ट व्याख्या केली नाही तर अभ्यासाला पूर्णत्व आणि शास्त्रीय दर्जा प्राप्त होणार नाही. शेतकरी कोणाला म्हणावयाचे किंवा मानायचे ? वृध्द म्हणजे नेमके कोण आणि वृध्द शेतकरी कोणाला म्हणायचे या प्रश्नांची उत्तरे नेमक्या आणि कमीत कमी शब्दात व्याख्येच्या रूपाने मांडणे अभ्यासाच्या सुस्पष्टतेच्या दृष्टीने आवश्यक म्हणून अभ्यासाच्या सुरुवातीलाच व्याख्या तयार केलेल्या आहेत. अर्थात व्याख्या तयार करीत असतांना कांही इतर संशोधकांच्या किंवा लेखकांच्या व्याख्या दिलेल्या असल्या तरी खरा भर स्वत: व्याख्या तयार करण्यावर आहे. इतरांच्या कांही सैध्दांतीक व पारंपारीक पध्दतीच्या ठराविक साच्यातील व्याख्या दिलेल्या असल्या तरी त्याचा केवळ स्पष्टीकरणासाठी साह्य व्हावे हाच हेतू आहे. एरव्ही संशोधकाला गडहिंग्लज तालूक्यातील अभ्यास क्षेत्रात वावरत असतांना जे पहायला व अनुभवायला मिळाले त्याच्या वरूनच व्यवहारी व्याख्या तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे कांही बाबतीत मतभेद होण्याची शक्यता नाकारलेली नांही. अभ्यासांती संशोधकांची खरा शेतकरी व खरा वृध्द शेतकरी कोण या विषयी जी मनोमन खात्री पटली त्याचीच व्याख्यांच्या रूपाने अभिव्यक्ती झालेली आहे.

जी व्यक्ती एखादा विशीष्ठ व्यवसाय करते तीलाच ती व्यवसायीक मानले जाते. काम करतो त्यालाच आपण कामगार म्हणतो.

कारकूनी करतो त्यालाच आपण कारकून म्हणतो. जो शिकवतो त्यालाच आपण शिक्षक म्हणतो. तद्वतच शेतक-याची व्याख्या खालील प्रमाणे करणे संयुक्तीक ठरते.

[१] ज्याच्या उपजिवीकेचा व्यवसाय शेती हाच असून इतर कोणताही उत्पन्नाचा व्यवसाय न करता स्वत: शेती हाच व्यवसाय करणारी व्यक्ती म्हणजे शेतकरी होय किंवा

[२] जो शेती हेच आपल्या उपजिवीकेचे साधन एकमेव मानून स्वत: शेती करीत असतो तो शेतकरी होय. थोडक्यात

[३] जो शेती करतो किंवा कसतो तो शेतकरी.

शेतक-याची ही व्याख्या सर्वांना पटेलच असा दावा नाही. पण वस्तुस्थितीचा सखोल अभ्यास व चिंतन केल्यानंतर वरील व्याख्या किंवा त्याच्यातील अभिप्राय पटायला हरकत नसावी. शेती हा बहुसंख्य लोकांचा व्यवसाय आहे. भारताच्या ३२ लाख ८८ हजार चौरस किलोमीटर्स क्षेत्रातील कांही मोजक्या नगर महानगरांच्या खालील मर्यादित भूभाग वगळता इतर सर्वच हा व्यवसाय व व्यवसायिक पसरलेले आहेत. असे बरेच लोक या व्यवसायामध्ये शिरलेले आहेत, किंवा सहभागी झालेले आहेत की त्यांना खरे शेतकरी कसे मानायचे हा संभ्रम निर्माण व्हावा. काश्मीरच्या थंड हवेत बंगला बांधून रहाणारा एखादा मुंबईचा कारखानदार केरळमध्ये हजारो एकर नारळाची शेती खरेदी करुन उत्पादन करीत असतो त्याला आपण शेतकरी मानायचा काय? शहरात रहाणारा एखादा नोकर अधिकारी किंवा व्यापारी वारसा हक्काने मिळालेली किंवा

मिळवलेली जमीन आपल्या गावातील रयत किंवा नोकरांच्याकडून करुन घेत असतो त्याला आपण शेतकरी समजायचे काय? असे कांही प्रश्न शेतकरी या व्यवसायाची व्याख्या तयार करीत असतांना निर्माण होणे सहाजिकच आहे. या सर्वांचा विचार करुनच अभ्यासक आपल्या अभ्यास क्षेत्रातील शेती व शेतक-यांचा अभ्यास करुन वरील व्याख्या तयार करण्याच्या निर्णयाप्रत आला.

केवळ होल्डींग किंवा जमीनीची मालकी हाच शेतकरी ठरण्याचा एकमेव निकष मानता येणार नांही. ज्याला शेतकरी या सदरात समाविष्ट करायचे त्याने त्या व्यवसायाच्या प्रक्रिये मध्ये किमान प्रमाणात समाविष्ट असले पाहिजे. अन्यथा त्याला तो व्यवसायिकाचा दर्जा देणे शास्त्रीय ठरणार नांही. फार झाल्यास अशा योती स्वत: न करता इतरांच्याकडून करुन घेणा-यांना मालक किंवा जमीनदार किंवा मॅनेजर किंवा संयोजक म्हणावे पण त्यांना शेतकरी मानता येणार नांही जमीनी त्यांच्या मालकीच्या असतात त्यातील उत्पन्नावर त्याचा कायदेशीर हक्क असतो. कांही निर्णय ते घेतात. प्रसंगी भांडवल गुंतवण्याची गरज असेल तर तशी गुंतवणूक योतीत करतात त्यामुळे त्यांना शेतमालक मानावे किंवा म्हणावे. शेतकरी हे नांव मात्र प्रत्यक्ष शेती करणा-यालाच दिले जावे असे संशोधकाचे मत बनलेले आहे.

## शेतक-यांचे प्रकार

गडहिंग्लज तालूक्यामध्ये शेतक-यांचा व योती व्यवसायाचा अभ्यास करीत असतांना वरील व्याख्ये मध्ये सांगीतल्या प्रमाणे प्रत्यक्ष शेती करणारे व करवून घेणारे शेतक-यांचे जे प्रकार आढळून आले त्याचे स्वरुप पुढील प्रमाणे

[१] स्वत: शेती करणारे शेतकरी :-

अभ्यास क्षेत्रामध्ये स्वत: शेती करणा-या किंवा कसणा-या शेतक-याचे संख्यात्मक प्रमाण जास्त आहे. नमून्यासाठी ज्या १०० लोकांच्या मुलाखाती घेतल्या त्यातील ९० टक्के शेतकरी स्वत: शेती करीत असल्याचे आढळून आहे. स्वत: प्रत्यक्षात शेती मध्ये काबाडकष्ट करणा-या शेतक-याचे साधारणत: पुढील दोन प्रकार पाडता येतील.

[१] स्वत: शेती कसणारे अल्पभुधारक शेतकरी -

अभ्यास क्षेत्रात स्वत: शेती करणारे जे बहुसंख्य शेतकरी आढळले त्याचे जमीनीचे क्षेत्र ५ एकराच्या आत असल्याचे दिसते त्याच बरोबर यातील बहुसंख्य शेतकरी जिरायत पध्दतीची शेती करणारे आढळून आले ज्यांना उपजिवीकेची दुसरे कोणतेच साधन उपलब्ध नाही. जिरायत जमीनीचा तुकडा हेच त्यांच्या पोटाचे साधन असल्यामुळे आपल्याला वर्षभर लागणारे अन्नधान्य त्या जमीनीतून पिकविण्या साठी असे शेतकरी स्वत: व आपल्या बायका पोरांच्या सह राबत असतात. हंगामी स्वरूपाच्या पेरणी कापणी किंवा मळणीच्या मुदतबंद कामासाठी कांही वेळा हे शेतकरी इतरांची मदत घेतात. तसेच आपले काम आटोपल्या नंतर फावल्यावेळी असे शेतकरी इतरांच्या शेतात मजूरीने कामालाही जात असल्याचे आढळले. क्षेत्र कमी असलेल्या जिरायत शेतक-यांना असा मोकळा वेळा भरपूर मिळतो. इतराकडे त्या वेळी काम उपलब्ध असेल तर ते कामाला जातात अन्यथा त्यांचा वेळ फुकट जातो त्यांची श्रमशक्ती वाया जाते या ग्रामीण श्रमशक्तीचे पध्दतशीर नियोजन करायला खूप वाव असल्याचे अभ्यासकाला आढळले.

[२] मजूरीने शेती करणारे भूमीहीन शेतकरी -

ग्रामीण भागातील २५ टक्के कुटूंबे शेत मजूरांची असतात. शासनाने नेमलेल्या शेतमजूर चौकशी समितीची ही आकडेवारी आहे. ज्या वेळी भारताची लोकसंख्या ६० कोटी होती त्यावेळी त्या शासकीय समितीने शेतमजूरांची संख्या १० कोटीच्या वर होती याचा अर्थ आज शेतमजूरांची संख्या १३ ते १४ कोटीच्या दरम्याने आहे वाढत्या लोक संख्ये बरोबर जमीनीचे तुकडीकरण आणि ग्रामीण बेकारीत पडणारी भर यामुळे हे आकडे कमी होण्या ऐवजी फुगतच जात आहेत २० व्या शतकातील हे शेतमजूर अद्यापही मध्ययुगीन भुदासाचेच काम करीत आहेत. जीवन जगत आहेत. असे अभ्यासकाला आढळून आले. त्यांच्या श्रमशक्तीची किंमत अद्यापही मातीमोलानेच केली जाते. कोणत्याही गावामध्ये अभ्यासकाला मजूरांना शासनाने ठरवून दिलेले किमान वेतन प्रमाणे मजूरी दिली जात नाही महाराष्ट्र शासनाने पुरूषांना १० व स्त्रीयांना ८ रूपये दिवसाची मजूरी ठरवून दिलेली आहे. मजूरीचे हे प्रमाण गडहिंग्लज तालूक्यात कोणत्याही गावात पाळले जात नाही. १९७३ साली नेमलेल्या भगवती समितीच्या अंदाजानुसार भारतात बेकार व्यक्तींची संख्या १ कोटी ८७ लाख होती. त्या पैकी १ कोटी ६१ लाख ग्रामीण बेकार होते. १९७३ नंतर दरवर्षी २० लाखाने लोकसंख्येतील वाढ गृहित धरली तर त्याच प्रमाणात बेकारी वाढलेली आहे. म्हणजे आज ग्रामीण भागात २ कोटीच्या दरम्याने बेकार असतील असा अंदाज आहे. सर्व ठिकाणी परंपरेने किंवा स्थानिक परिस्थितीनुसारच मजूरीचे दर ठरवले जातात. पहाणी मध्ये पुरूषांना ५ ते ७ रु. व स्त्रियांना ३ ते ४ रूपये मजूरी दिली जात असल्याचे आढळले.

मजूराचे स्वतंत्रा मस्टर किंवा हजेरी पुस्तक ठेवण्याचे शासनाचे कायदेशीर बंधन आहे. पण कोत्याही शेतमालकाने ते पाळलेले आढळले नांही दुर्दैवाने कोणत्याही मजूराला या गोष्टीची कल्पना दिसून आली नांही. शासनाचे कागदातील कायदे कायदे त्याच्यापर्यंत अद्याप पोहोचलेले दिसत नांहीत. शासनाची किमान वेतनाच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा आहे. तालूका व जिल्हा पातळीवर त्यासाठी कार्यालये व अधिकारी आहेत. पण फारच थोडे सरकारी अधिकारी खेड्यापाड्यात दिसत असतात. एरव्ही सर्वजण तालूक्यातील कार्यालयात पंख्याखाली बसूनच सर्व खोटे रिपोर्ट करून कागदी घोडे नाचवित असतात. अधिक चौकशी केल्यानंतर कांही गावा मध्ये वर्षातून एखादेवेळी अधिकारी फेरी मारतात. कांही शेत मालकांना दरडावतात पण एखादा कोंबडीचा बळी दिला किंवा थोडा हात ओला केला की हे उतगो आवेशान आणलेले त्रास्त संबंध शांत होतात. इतकेच नव्हे तर अधिक खिसा गरम करणाऱ्या शेतमालकांना स्वत:च्या हस्ताक्षरात मस्टर तयार करून देतात. त्याच्यावर मजूरीचे किमान खोटे आकडे स्वत:च लिहून खोटे आंगठेही स्वत:च्या समोर करून घेतात असे कांही शेतकरी व शेतमजूरांनी सांगीतले.

अशा स्वत: मजूरीने शेती करणाऱ्या शेतक-यांना शेतमालक मजूरी धान्याच्या किंवा पैशाच्या स्वरूपात आठवड्यातून एकदा देतात. पण त्याच्या मजूरी देण्या घेण्याचे कोठेही रेकॉर्ड ठेवलेले नांही. मजूरांना स्वत: मजूरीची अवजारे आणावी लागतात खुरपी, कुदळ, खोरे फावडे वगैरे अवजारे मजूर स्वत:च आणीत असतात. किमान वेतन, प्रॉव्हिडंड कामाची शाश्वती, डिव्हिडंड या सर्व कल्पनेपलीकडच्या गोष्टी असल्याचे शेतमजूरांच्या संदर्भात आढळतील . महाराष्ट्र सरकारचा रोजगार हमी कायदा देखील आमच्या अभ्यासक्षेत्रातील शेतमजूरांना रोजगाराची किंवा किमान वेतनाची कोठेच हमी देताना आढळली नांही. किमान दहा

व्यक्तींनी एकत्र येवून काम मागीतले तर पांच कि•मी•च्या आत मजूरांना काम देण्याला शासन कायद्याने बांधील राहते पण एकत्र कसे यायाचेव कोणी एकत्र आणायचे? कोणाकडे आणि कसे काय मागायचे या प्रश्नांची उत्तरे गरीब अडाणी शेतमजूरांना माहित नाहीत• त्यामुळे रोजगार ही नाही आण हमीही नाही उलट मजूरांना रोजगार नाही आणि रोजगारा ला मजूरक नाही असेच या हमी योजनेचे स्वरुप आहे अगदी स्पष्टच बोलायचे झाले तर शासनाची रोजगार हमी योजना ही निदान आमच्या अभ्यास क्षेत्रात तर " रोजगार हमी योजना " ठरलेली आहेक परंपरागत पध्दतीने मिळेल तेंव्हा मिळेल तेवढे आणि मिळेल तसे काम करुन मिळेल त्या मजूरीवर ग्रामीण भागातील हा सारा शेतक-यांचा वर्ग आपली गुजरान करीत आहे•

[२] <u>दुस-याकडून शेतकरुन घेणारे शेतकरी :-</u>

स्वत: शेतकी मध्य

स्वत: शेती मध्ये कोणत्याही स्वरुपाचे कष्ट नकरता दुस-या कडून शेतीकरुन घेणारा अप्रत्यक्ष शेतक-यांचा एक वर्ग भारतीय शेतक-यांच्या मध्ये असल्याचे गडहिंग्लज तालूक्यातील शेतक-यांच्या अभ्यासामध्ये आढळून आले हा वर्ग तसा संख्येने कमी असतो मात्र क्षेत्राने जास्त असतो• x १९६२ सालच्या नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या T आकडेवारीनुसार ५० एकरा पेक्षा जादा शेती असणा-याचे एकूण लोक संख्येत प्रमाण फक्त १•०३ टक्के इतकेच होते याचा अर्थ ५० एकराच्या वरील जमीनदारांची संख्या दोन टक्के होवूनही कमी झाले• या उलट ५ एकरा पेक्षाकमी जमीन

---

संदर्भ :- नॅशनल सॅम्पल सर्व्हे रिपोर्ट १९६२

असणाऱ्यांची संख्या ४५ टक्के आहे मात्र त्यांच्याकडे एकूण लागवडीखाली असलेल्या क्षेत्रा पैकी फक्त ७.११ टक्के जमीन आहे ही आकडेवारी २० वर्षांपूर्वीची आहे. त्यानंतर तुकडीकरणा मुळे ५ एकराच्या आतील संख्या निश्चित वाढलेली असेल.

मोठे जमीनदार संख्येने कमी असले तरी त्यांच्या जमीनीचे प्रमाण संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या जास्त असते. गावातील जास्तीत जास्त जमीनी त्यांच्याकडे असतात शिवाय चांगल्या दर्जाच्या जमीनी अशा जमीनदारांच्याकडे असतात. गावालानदी असेल तर नदी काठच्या जमीनी बहुतास अशा मोठ्या जमीनदारांच्या मालकीच्या असतात अभ्यास क्षेत्रातील एका गावा मध्ये तर संपूर्ण नदीकाठ एकाच जमीनदाराच्या मालकीचा असल्या मुळे इतरांना नदीतून पाणी उपसण्यासाठी त्याने बंदी केली शेवटी जमीन त्यांच्या मालकीची असली तरी नदी त्यांच्या मालकीची नाही असा कोर्टाने निकाल दिला व इंजिन व पाईप बसविण्या पुर्ती जमीन द्यायला त्याला कायद्याने भाग पडले पण या झगडण्यात त्या गावातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची २० वर्षे गेली √ या मुदतीत त्या अल्प भूधारकांना बागायत शेती करता आले नाही मात्र दरम्यानच्या काळात त्या जमीनदाराने स्वतःच्या चांगल्या आणि भरपूर जमीनीत उसाचे भरपूर पिक घेवून आपल्या संपत्तीत भरपूर भर घातली आज तो शेतकरी या तालूक्यातील एक बडा बागायतदार म्हणून ओळखला जातो त्या खेड्यात त्याचा टुमदार बंगला आहे व मडहिंग्लजला येताना तो स्वतःच्या कारने येत असतो.

असे शेतकरी स्वत: शेती मध्ये कष्ट करीत नाहीत चांगल्या आणि भरपूर जमीनी असल्या मुळे त्यांना तसे करण्याची गरज नसते शेतीच्या संबंध त्यांच्या चुलीशी तथा प्रत्यक्ष आणि ताबडतोब येत नाही त्यामुळे स्वत: घाम न गाळता असे शेतकरी दुस-याकडून शेती करुन घेतात दुस-याकडून शेती करुन घेण्याचे गडहिंग्लज तालुक्यातील या मोजक्या जमीनदारांनी दोन मार्ग अवलंबल्याचे अभ्यास पहाणीत आढळून आले.

(१) रयतवारीने किंवा कुळांच्याकडून जमीनी करुन घेणे :-

" कसेल त्याचि जमीन " या तत्वावर कूळ कायदा करण्या मध्ये महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेतला देशात हा कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. १९५४ पूर्वी ज्यांची कागदोपत्री कूळ म्हणून नोंद असेल त्यांना संरक्षीत कूळ म्हणून शासनाने घोषीत केले संरक्षीत कूळ याचा अर्थ कूळ कायद्यानुसार जमीनीची मालकी मिळण्यास पात्र असणारे कूळ कायदा १९५६ साली अमलात झाला मालकांनी कागदपत्रे बदलू नयेत म्हणून त्या अगोदरच्या चार वर्षा पूर्वीच्या म्हणजे १९५४ च्या नोंदी ग्राह्य मानन्यात आल्या. तरीही शान्बाव जमीन मालकांनी कूळ कायद्याचे " हूळ कायद्यात " रुपांतर करण्यासाठी ज्या युक्त्या लढविल्या त्याची प्रचिती गडहिंग्लज तालुक्याचा अभ्यास करतांना आली. कूळ कायद्यातून पळवाटा काढून जमीनीची मालकी टिकविण्यासाठी जमीन मालकांनी जून्याच कुळाचे राजीनामे घेतले वकीलांच्या सातत्या

कूळांच्याकडून " मी राजीखुषीने जमीनीवरचा कूळ हक्क स्वत: सोडून देत आहे " असे लिहून घेतले ज्यांच्यासाठी कूळ कायदा केला त्या कुळांच्या मध्ये अपेक्षा प्रमाणे प्रसार न झाल्याने किंवा खऱ्या अर्थाने संरक्षण देण्याची यंत्रणा न झाल्याने कुळांना फसवून प्रसंगी धाकदपडसदा ✓ दाखवून राजीनामे घेतले कांही कुळाने स्वत:हून मालकांची जमीन आपण फुकट घेणे पाप आहे अनैतिक आहे किंवा अप्रतिष्ठेचे आहे व बेईमान पणाचे ठरेल म्हणून राजीनामे दिले. किंवा जमीनी स्वखुषीने सोडल्या आश्चर्याची गोष्ट म्हणजे राजीनामे दिले किंवा जमीनी स्वखुषीने सोडल्या असे कागदोपत्री रेकॉर्ड झालेले असले तरी अद्याप इतर बाबतीत कांही फरक पडलेला नांही कुळे ही तीच जमीनीही त्याच किंवा कसणारे तेच आणि कसून घेणारे ही तेच असे स्वरुप आहे. प्रत्यक्षात कूळ किंवा रयत म्हणून भागाने किंवा खंडाने जमीनी केल्या जातात. मात्र ✓ कागदोपत्री त्याची कोठेच नोंद नसते. त्यामुळे मालक केंव्हाही प्रसंगी उभ्या पिकावर कूळ असलेल्या शेतकऱ्यांला बांधा बाहेर काढू शकतो अशा असुरक्षित कूळांचा एक वर्ग अभ्यास क्षेत्रात निर्माण झाल्याचे आढळले अर्थात इतरत्र ही अशीच परिस्थिती असणार यात शंका नांही

कागदोपत्री कूळ कोष्टकी कोठेही नोंद नांही तसेच ही कुळे वर्षभर शेतात राबून शेवटी खळ्यावर धान्य वाटून घेतात व मालकांचा ठरलेला हिस्सा घरपोच करुन उरलेला भाग आपल्या घरी नेतात उसा सारखे बागायत पिक असले तर सर्व उस मालकांच्या नांवावर फॅक्टरीला जातो त्याची बिले मालक परस्पर घेतो व वर्षभर जसे लागेल तसे कुळांना पैसे देवून उपकाराच्या ओझ्याखाली राबवून घेतो

कुळे असूनही कूळ कायद्याचा लाभ न मिळालेल्या या शेतकऱ्यांना कायदे कोणताही फायदा देवू शकत नाही ही विदारक वस्तुस्थिती संशोधन होत्रात आढळून आली.

[५] नोकरांच्याकडून शेती कसून घेणे :-

स्वत: शेती न कसता इतरांच्याकडून कसून घेण्याचा अनुपस्थित मालकांच्याकडून आणखी एक मार्ग अवलंबन्यात येतो. तो म्हणजे नोकर किंवा गड्यांच्याकडून शेती कसून घेणे राजीनामे दिलेल्या कुळांना कूळहक्कापासून कायमचे वंचित करण्यासाठी शेत मालक त्यांच्याकडून नोकर नामे लिहून घेतात असे आढळून आले. नोकरनामा याचा अर्थ " मी मालकाकडे नोकरीला किंवा चाकरीला असून पगाराच्या मोबदल्यात त्यांची जमीन कसतो " असे लिहून देणे प्रत्यक्षात शेतकरी कूळ म्हणून भागाने किंवा खंडानेच शेती कसत असतो पण त्याची कागदपत्रे मात्र नोकर म्हणूनच तयार केली जातात. त्यामुळे कूळ म्हणून तो कोणताही हक्क सांगू शकत नाही. किंवा त्याची जमीनीच्या कूळ कोष्टकी नोंद होवू शकत नाही असे प्रत्यक्षातील कुळे पण कागदा वरील नोकर असणारी कित्येक शेतकरी गडहिंग्लज तालुक्यात आजही आहेत. एका व्यक्तीचा नोकरनामा असतो पण प्रत्यक्षात त्या व्यक्तीचे सर्व कुटूंब त्या शेतात वर्षभर राबत असते.

नोकर म्हणून शेती करणारे कांही शेत मालक खरोखरच

कांही व्यक्तींना नोकर म्हणून आपल्या शेतात किंवा घरात ठेवतात. मात्र अशा ह्या-या नोकरीला असलेला किंवा चाकरीला असलेल्या कोणत्याही मालकाने त्याचे कागदोपत्री रेकॉर्ड ठेवलेले नसते. अशा नोकरांचा पगार वर्षावर किंवामहिन्यावर ठरविण्यात आलेला असतो. जेवण हाने मालकांच्याकडे गृहित धरून तो पगार ठरतो. पहाणी मध्ये आढळून आलेल्या कांही उदाहरणावरून साधारणत: कायमचा ठेवून घेतलेल्या पुरुष गड्याला वर्षाला ५०० ते १००० पर्यंत पगार दिला जातो. याचाच अर्थ महिन्याला १०० रुपया पेक्षा कमी म्हणजे दर रोज ३ रुपयेचा दरम्यान पगार दिला जातो. जेवण हाण्याची व राहण्याची सोय केलेली दिसते. पण त्यातही मालकाचा स्वार्थ असतो तो म्हणजे नोकर किंवा चाकर सर्व वेळ सेवक म्हणून राबविण्याच्या शेतात राहणारा गडी रात्रंदिवस ड्यूटीवरच असतो. घरात राहणार गडी घरातील कामे करीत असतो. जनावरांची देखभाल करीत असतो. म्हणजे २४ तास ड्यूटीवरच असतो. इतके काम करूनही त्याला दुय्यम नागरीकाचीच वागणूक मिळत असते. त्याच्या राहण्याची म्हणजे फक्त झोपण्याची व्यवस्था म्हणजे गुरांच्या गोठ्यात किंवा घरा बाहेरच्या पडवीत असते इतर सर्व क्रिया तो बाहेरच उरकतो. मोकळा वेळच नसल्याने राहण्याची सोय करण्याचा प्रश्नच येत नांही. फक्त झोपन्यासाठी गुरांच्या गोठ्यातील थोडीशी जागा त्याला पुरते.

अशा प्रकारे नोकरी किंवा चाकरी करणारे लोक प्रामुख्याने भूमीहीन गरीब किंवा मागासलेल्या जाती जमातीतील असतात. त्या मुळे त्यांना मिळणारे वागणूक नेहमीच दुय्यम असते त्याचे जेवणाचे ताट वहाचा क्म स्वयपाक घरा बाहेरकिंवा गोठ्यातच ठेवलेला असतो. जेवण वाढून दिल्या नंतर त्याच ठिकाणी जावून त्याला जेवावे लागते. स्वत:चे ताट स्वत:च धोवून ठेवावे लागते. इतकेच नव्हेत तर त्याला वाढतांना देखील शिवाशिव न होता वरुन वाढले जाते पाणी हे देखील वरुन वाढले जाते. अभ्यास क्षेत्रातील जमीनदार प्रामुख्याने मराठे लिंगायत ब्राम्हण या उच्च वर्णीयातील व गडी किंवा चाकर महार मातंग चर्मकार व इतर मागास जाती जमाती असलेने हा जाती भेद गड्यांच्या बाबतीत नेहमीचा भाग बनलेला आढळून येतो.

नोकर किंवा चाकर त्याच गावचा असेल तर त्याची झोपडी त्याच्या भावकी मध्ये असते तर त्याची झोपडी त्याच्या भावकी मध्ये असते तेथे त्याचे आईबाप व बायका मुले असतात. २४ तास मालकाच्या चाकरीत असलेल्या या अशा दुर्दैवी पुरूषांना आपल्या कुटूंबाचा सहवास फारच कमी मिळतो. कांही वेळा त्याचे सर्व कुटूंबीय मालकांच्या शेतावर दिवस मजूरीवर असते. त्याला मालकाची नजर चुकवूनच संसार करावा लागतो कधीही स्वत:च्या घरात न दिसणाऱ्या या दुर्दैवी चाकरांना मुले कशी होतात त्याचा संसार कसा चाललेला असतो कोणते कौटूंबीक सुख आणि समाधान त्यांना मिळते हा एक संशोधनाचाच विषय

आहे. स्वतंत्र भारतातील या अधुनिक ग्रहस्थांची किंवा गुलामांची संख्या गडहिंग्लज तालुक्यात हजारोने आढळतील तर संपूर्ण देशभार किती असेल न करणे बरे.

[२] वृध्द शेतकरी किंवा शेतकरी वृध्द :-

मानवी जीवना मध्ये परावलंबीत्वाच्या काळ इतर कोणत्याही प्राण्या पेक्षा तुलनात्मक दृष्टया जास्त आहे. जन्मा पासून सुरुवातीचा बालपणाचा काळ हा साधारणत: १२ वर्षां पर्यंतचा मानला जातो हे पहिले तप मानवाचे पिल्लू किंवा मूल कुटूंबातील इतरांच्यावर सर्व बाबतीत अवलंबून असते इतरांना त्यांच्या भरण पोषणाची जबाबदारी स्वीकारावी लागते. शारीरीक बौध्दीक मानसिक घडनघडनीची सर्व जबाबदारी स्वीकारावी लागते. स्वत:वर कोणतेही जबाबदारी नसतांना आपली सर्व जबाबदारी इतरांच्यावर ठेवून जगण्याचा मानवी जीवनातील हा एकमेव कालखंड असतो. इतर सर्व जन बालकांची सर्व प्रकारची काळजी घेत असतात हा कालखंड शेतक-यांच्या मुलांच्या बाबतीतही अपवाद नांही निसर्ग पुत्र असलेली शेतक-यांची मुले या कालखंडात नैसर्गीक देशाग्याचे आकंठ पाशान करीत असतात. इतरांना कांही सोसावे लागले तरी शेतकरी आपल्या मुलांना [redacted] फुला प्रमाणे जपत असतात. सर्व प्रकारच्या खडतर जिवना मध्ये अपत्य हे शेतक-यांचांच जीवनातील कोमल सुखा समाधानाचे प्रकरण असते.

बालपणा नंतरचा तारूण्याचा कालखंड सुरू होतो या काळातही व्यवहाराची जीवनाच्या झळा फारशा शेतकरी तरूणांना जाण्वत नाही किंवा त्या जानीवण्या इतके ते नसतात. तारूण्याच्या धुंदी मध्ये ते वावरत असतात. शारीरीक जोम आणी उत्साहा मध्ये तारूण्याची १०-१२ वर्षा मध्ये निघून जतात आणिनी मग गृहस्थाश्रमात प्रवेश केलेल्या प्रौढ शेतक-यांना कळूहळू जीवनातील समस्यांच्या सामोरे जावे लागते प्राप्त परिस्थितीत काबाड कष्टाच्या जोरावर समस्या सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होतो. बुध्दी पेक्षा शारीरीक कष्टाच्या जोरावारच बवरि जीवनातील समस्या सोडविण्यावर त्यांचा अधिक भर असतो आमच्या अभ्यास पहाणी मध्ये आम्हाला जाणाविलेली वस्तूस्थाती असी आहे की अचूक निर्णय किंवा बुध्दीच्या सहाय्याने निर्णय ही बाब जिवना मध्ये यशस्वी होण्यासाठी आवशयक असते. याची जाणीव ग्रामीण शेतकरी वर्गामध्ये फारच कमी आहे. निरक्षारतेचे अधिक प्रमाण आणि परंपरागत जीवन पध्दती या मुळे कदाचितच असे घडत असावे. पण व्यावसायाची निवड पध्दती आणि एकंदर सर्वच जीवन पध्दतीवर परपरेचा पगडा जास्त असतो. चाकोरी बाहेरके जावून जीवन जगण्याचे प्रमाण ग्रामीण शेतक-यांच्या मध्ये कमी नागरी सांस्कृतीतील माणूस प्रसांगोपात आपल्या जीवनात अनेक बदल स्वीकारतो किंवा घडवून आणतो बदललेल्या परिस्थातीशी चटकन जमवून घेतो. तशा ब ग्रामीण झटकन बदलत नाही. पूर्वापार चालत आलेल्या पध्दतीनेच शेतकरी प्रौढावस्थेतील म्हणजे गृहस्थाश्रमातील जीवन जगतो.

प्रौढावस्थेतील पांच पंचवीस वर्षाच्या कालखंडानंतर शेतकरी वृध्दावस्थेच्या जवळपास पोहचतो. साधारणत: पन्नाशी नंतर त्याच्या जीवनाचा प्रवास या दिशेने सुरू होतो शारीरीक कुवत कमी होवू लागते पूर्वी प्रमाणे कष्टाची कामे करणे अवघड होवू लागते व शारीर प्रकृतीच्या तक्रारी सुरू होतात. आणि शेतकरी वृध्द किंवा म्हातारा होवू लागतो या ठिकाणी शेतक-यांच्या जीवनातील वृध्दावकाळ किंवा म्हातारपणा सुरू होते हा कालखंड ही तसा दिर्घ स्वरूपाचा असतो. म्हातार पणाची लक्षणे दिसू लागण्या पासून सहज बारा वर्षा पर्यंतचा किंवा एखाद्या तपा पर्यंतचा हा कालखंड असतो याचाच अर्थ पहिले आणि शेवटचे अशी दोन तपे माणूस परावलंबी असतो.

वृध्दत्वाच्या संदर्भात शेतक-यांच्या बाबतीत नेमका कोणता कालखंड मानावा किंवा शेतक-याचे म्हातारपण नेमके केंव्हा सुरू होते या बाबतीत मतभेद होण्याची शक्यता गृहित धरावी लागते वृध्दत्वाच्या कालखंडाची काटेकोर विभागणी करणे तसे थोडे अवघड आहे. वृध्दत्वाची केलेली व्याख्याही सर्वांना काटेकोर पणे लागू पडेल असे नसते कारण वृध्दत्वाच्या आवस्थेचा शारीरीक कुवतीशी संबंध असतो आणि या बाबतीत सर्वांच्या बाबतीत सारखी आवस्था गृहित धरता येत नाही तरी पण वृध्द शेतक-यांचा अभ्यास करतांना आम्हाला जाणवलेला जो भाग आहे त्याला अनुसरून आम्ही वृध्द शेतक-यांची किंवा शेतकरी वृध्दाची व्याख्या खालील प्रमाणे केलेली आहे.


[१] " शेती व इतर तत्सम व्यवसाय करण्याची वयोमानामुळे कुवत कमी झालेली व्यक्ती म्हणजे वृध्द शेतकरी होय "

शेती हा शारीरीक कष्टाचा व्यवसाय आहे. अद्यापही आपल्या शेतीचे अपेक्षे प्रमाणे यांत्रिकीकरण झाहून आलेले नाही त्यामुळे शेतक-यांचा शारीरीक कष्टावरच भार जास्त असतो. म्हणून शारीरीक कुवत किंवा ताकत हा शेतक-यांना आवश्यक घटक असतो. निसर्ग नियमानुसार पन्नासी नंतर शेतक-यांची ताकत कमी होवू लागते याचा आहार व राहणीमान चांगले असते अशा शेतक-यांची ताकत कांही काळ जादा टिकते. तर प्रतिकूल परिस्थितीमुळे निकृष्ट आहार व राहणीमान असणा-या शेतक-यांची ताकत लवकर संपुष्टात येते कांही शेतकरी वयाच्या साठी पर्यंत चांगले काम करीत असतात. तर कांही शेतक-यांना पन्नासी नंतर कष्टाची कामे करणे अशक्य होते साधारणत: दोन्हीही बाबींचा विचार करता साठ वर्षाच्या वया नंतर शेतकरी वृध्दत्वा मुळे शारीरीक कष्टाची किंवा जोखीमीची कामे करायला अपात्र ठरतो असे मानायला हरकत नाही. इतर क्षेत्रातील किंवा व्यवसायातील वृध्दत्वाचा कालखंड देखील साठ वर्षानंतरच मानला जातो. या नंतर माणूस कार्यक्षमतेने कार्य करू शकत नाही असेच शासनाने गृहित धरून कायदे केलेले आहेत. म्हणून व्यवसायीक निवृत्तीचे वय साठ हेच मानले जाते. त्या दृष्टीने वृध्द शेतक-यांच्या व्याख्या खालील प्रमाणे करता येईल.

[२] " वयाच्या साठ वर्षा नंतर शेतीतील कष्टाची कामे करायला शारीरीक दृष्टया अपात्रा ठरलेली व्यक्ती म्हणजे वृध्द शेतकरी होय "

इतर क्षेत्रातील व्यक्ती प्रमाणे साठ नंतर शेतक-याला ही कष्टाची कामे होत नाहीत म्हणून साधारणत: ब-या आर्थिक परिस्थितीतील शेतकरी न कळत कष्टाची कामे टाळू लागतो. हाता खालच्या नोकर चाकर कडून मजूरांच्याकडून किंवा घरातील इतरांच्या कडून ही तो कामे करुन घेवू लागतो. आवश्यक निर्णय घेणे त्याची अंमलबजावणी इतरांच्याकडून करुन घेणे देखारेख करणे अशा त्याच्या कामात बदल होतो. तो पूर्ण पणे निवृत्त होत नाही परंतू प्रत्यक्ष शारीरीक कष्टा पासून निवृत्ता होतो.


वृध्दाप काळात ही शेवट पर्यंत निवृत्त न होणारा आणखी एक वर्ग आम्हाला आमच्या अभ्यास क्षेत्रात आढळला तो म्हणजे शेतमजूर वृध्दांचा पोट भरण्याची कोणतीही सोय नसल्यामुळे हा शेतक-यांचा वर्ग गात्रे पूर्ण पणे गलीतमात्रा होई पर्यंत कामे करीतच असतो. शरीर साथ देत असतांनाही किंवा शरीरात अनेक व्याधी व अजार घर करुन राहत असतानाही मजूरीची कष्टाची कामे करीत असणारा वर्ग ग्रामीण शेतमजूर शेतक-यांच्या मध्ये दखलनीय संख्येने आढळतो.




अभ्यास क्षेत्रात वावरत असतांना समाजातील वृध्दांचे जे प्रकार आढळून आले ते ~~पुढील~~ वरील प्रमाणे.

## वृध्दाचे शिक्षण धर्म व जात दर्शविणारे पत्रक

| अ.नं. | हिंदू | | | | | मुस्लीम | ख्रिश्चन | जैन | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिक्षण | मराठा | लिंगायत | ब्राम्हण | इतर | | | | |
| [१] | अशिक्षित | २४ | ४ | - | - | १ | - | - | २९ |
| [२] | १ ली ते ४ थी | १८ | १ | - | - | १ | १ | २ | २३ |
| [३] | ५ वी ते ८ वी | १७ | १ | - | - | - | - | - | १८ |
| [४] | ९ वी ते १० वी | १५ | - | १ | - | - | - | - | १६ |
| [५] | पदवीपर्यंत | ११ | - | ३ | - | - | - | - | १४ |
| | | ८५ | ६ | ४ | - | २ | १ | २ | १०० |



SHIVAJI UNIVE
LIBRARY
KOLHAPUR